# कोविडच्या कार्यकाळांमध्ये झालेल्या घोटाळ्याची तक्रार दीपक थोरात यांनी वेळोवेळी दिलेली होती!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564




■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १८७ ■ बुधवार दि.२६ मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 187 ■ Wednesday Dt. 26 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# कोविडच्या काळात लोक मरत होते आणि डॉ. कलेक्टर नेते हे मढ्यावरचं लोणी खात होते?

## राजकीय नेत्यांच्या वरदहस्त लाभलेली एजन्सी आणि ११० कोटी रुपयाचे कोविड साहित्य खरेदी फक्त कागदावरच?

### दिपक थोरात यांनी केलेल्या तक्रारीचा मुद्दा आ.नमिता मुंदडा आणि आरोग्य मंत्री आबीटकर यांच्या कामी आली!

### दैनिक महाराष्ट्र आरंभ कोविड कार्यकाळातील भ्रष्टाचाराचा पाढा भाग एक लवकरच सुरु करणार


### कोविड कार्यकाळातील साहित्य व निधी खर्चाबाबतच्या प्रशासकीय मान्यता दैनिक महाराष्ट्र आरंभच्या हाती!

### कोविड काळात लोक मरत होते आणि अधिकारी नेत्यांच्या माध्यमातून २८५ कोटी रुपये लुटत होते?

### २८५ कोटी रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी तक्रार असताना कोट्यवधी रुपयांची बीले काढलेच कशी?

बीड । प्रतिनिधी

कोविड संसर्गाने जगाला हैराण केले. त्या काळात शासनानेही उपाय योजनांसाठी निधी देताना हात सैल ठेवला. मात्र, निधीतून अत्यावश्यक बाबींऐवजी किरकोळ बाबींवर कोट्यावधींचा खर्च झाला. याप्रकरणी दिपक थोरात यांनी सातत्याने कोविडमधील उधळपट्टी चव्हाट्यावर आणून, तक्रार केली होती. मात्र, या उधळपट्टीत चौकशीत ठपका असलेल्या अधिकाऱ्यांची भलीमोठी यादी आहे. तत्कालिन मंत्र्यांचा राजकीय हस्तक्षेपही या उधळपट्टीला कारणीभूत होता.



### कोविड काळात लोक मरत होते आणि २८५ कोटी रुपये अधिकारी नेत्यांच्या माध्यमातून लुटत होते?

तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुरेश साबळे, डॉ.सूर्यकांत गीते अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक सुखदेव राठोड, औषध भांडार प्रमुख शेख रियाजुद्दीन, आदिनाथ मुंडे, तानाजी ठाकर, एजाज अली उस्मानी यांच्या कार्यकाळामध्ये सुमारे २८५ कोटी रुपयांचा भ्रष्टाचार स्पष्ट झालेला आहे. यातच ११० कोटी रुपयांची खरेदी त्यांनी प्राप्त कागदावरच केली होती. याची तक्रार दीपक थोरात यांनी स्वतः दिलेली आहे. सदरील तक्रार ही २०२० मधील दिलेली आहे. दिलेल्या तक्रारीत तात्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक, औषध भांडार प्रमुख, २८५ कोटींच्या घोटाळ्यात मास्टरमाईंड असल्याचे आहे. तसेच २८५ कोटी रुपयांच्या घोटाळा प्रकरणी तक्रार असताना कोट्यवधी रुपयांची बिले काढलेच कशी त्याची देखील चौकशी होणे गरजेचे आहे, या प्रकरणी दिपक थोरात हे आरोग्यमंत्र्यांची लवकरच भेट घेणार आहेत.

### लोक मरत होते आणि हे लोक मढ्यावरचं लोणी खात होते?

तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात, विद्यमान डॉ. सुरेश साबळे यांनी भ्रष्टाचार केलेल्या कोविडशाहीचे खरेदी खर्च ११० कोटी ते २८५ कोटी रुपये खर्चाच्या संदर्भात जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांना निवेदन दिले, यावेळी नक्कीच कारवाई करू, या भ्रष्टाचाराच्या खूप चर्चा ऐकल्या आहेत. याविषयी मार्गी लागणार म्हणून आश्वासन दिले होते. तसेच दीपक थोरात यांनी दिलेली तक्रार आरोग्य मंत्री आबीटकर व आमदार नमिता मुंदडा यांना कामी आली आहे.


कोविडसाठी शासनाने जिल्हा नियोजन समितीतून विशेष निधीची तरतुद केली. यासह गौण खनिज, आपत्ती व्यवस्थापनातूनही निधी उपलब्ध करुन देण्यात आला. प्रशासन आणि आणि पर्यायाने जिल्हा नियोजन समितीसाठी त्या काळी वाल्मीक कराडचा शब्द अंतिम असल्याने त्याने सांगीतलेली टेंडरच फायलन झाली. आरोग्य प्रशासनाने कार्डिॲक ॲम्ब्युलन्सचा खरेदीची प्रशासकीय मान्यता रद्द करुन त्याच्या सांगण्यावरुन हा निधी सीसीटीव्ही खरेदी आणि रंगरंगोटीसाठी वापरला गेला. विशेष म्हणजे उपचारासाठीचे आयसीयु बेड,रेमडिसीव्हीर इंजेक्शन्स शासनाने दिले आणि कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतनही राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानातून केले गेले. तरीही जिल्ह्यात ८४ कोटी रुपयांचा निधी कोविड उपाय योजनांसाठी खर्च झाला. त्यावेळी सीसीटीव्ही बंद आहेत, ऑक्सीजन प्लॅट सुरु नाहीत. असे अधिकाऱ्यांनी अहवाल देऊनही देयके अदा केली गेली.

सामाजिक संस्थांनी सॅनीटायझर देऊनही दाखविला खर्च सामाजिक संस्था, शासनाने सॅनीटायझर पुरवूनही केवळ सॅनीटायझरसाठी दोन कोटीहून अधिक निधी खर्च केला गेला. औषधी, सॅनिटायझर पुरविणाऱ्या आणि सीसीटीव्ही लावून देणाऱ्या ठेकेदार यंत्रणा सत्ताधाऱ्यांच्या निकटच्या होत्या. त्या काळात जिल्ह्यात पाचशेहून अधिक आयसीयु बेड तयार केले. आज ते कुठेयत हा प्रश्न आहे. या यंत्रणेचे नंतरच्या काळात काय झाले याचाही तपास होणे आवश्यक आहे.

तर, जिल्ह्यात २३ कोटी रुपये खर्च करुन १० ऑक्सीजन निर्मिती प्लॅंट उभारले आणि आजही आरोग्य विभाग विकत ऑक्सीजन घेते. मग, हे प्लॅंट उभारण्यामागे काय हेतू होता, हाही प्रश्न आहे. विशेष म्हणजे एकही प्लॅंटचे काम पूर्ण नसताना ठेकेदारांचे देयके अदा झाली हे विशेष. त्याकाळी सत्ताधारी किंवा वाल्मीक कराड सांगेल त्या बाबी आरोग्य करत राहीले. अधिकारी म्हणून पदावर बसल्यानंतर त्यांचाही यात दोष होताच. आज याच कारणावरुन डॉ. अशोक थोरात यांचे निलंबन झाले. परंतु, कोविड काळात तीन जिल्हा शल्यचिकीत्सक बदलले. डॉ. थोरात यांच्यासह त्या काळातील इतर जिल्हा शल्यचिकीत्सक, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकीत्सक, भांडारपाल, औषधी निर्माण अधिकारी, मुख्य प्रशासकीय अधिकारी अशी ठपका ठेवलेली मोठी यादी आहे. महसूलसह, जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांसह आरोग्य विभागाच्या पथकांनी केलेल्या चौकशांतून हे समोर आले. दैनिक महाराष्ट्र आरंभ चे संपादक दिपक थोरात यांनी सातत्याने यावर आवाज उठविला आणि यावर तक्रार दाखल केली. दरम्यान, आता या प्रकरणी येत्या तीन महिन्यांता कारवाई अंतिम करण्याचे मंत्री प्रकाश आबीटकर यांनी सांगीतले आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणातील सर्वच जबाबदार व्यक्तींवर कारवाई होते का हे पाहणे अतिशय आवश्यक असणार आहे.







कोविड काळामध्ये झालेल्या घोटाळ्याची तक्रार दिपक थोरात यांनी वेळोवेळी दिलेल्या आहेत. आणि दिपक थोरात यांनी केलेला एकुण तक्रारीचा मुद्दा आमदार नमिता मुद्रा व आरोग्यमंत्री आबीटकर यांच्या कामी आला आहे. राजकीय नेत्यांच्या वरदहस्त लाभलेले एजन्सी आणि ११० कोटी रुपयांत कोविड साहित्य खरेदी फक्त कागदावरच होती. या अगोदर तत्कालीन जिल्हा चिकित्सक डॉ. सुर्यकांत गीते, डॉ.सुरेश साबळे, डॉ.सुखदेव राठोड, डॉ. अशोक हुबेकर, तानाजी ठाकर, एजाज अली उस्मानी आदिनाथ मुंडे शेख रियाजुद्दीन हे राजकीय नेत्यांच्या वर जास्त लाभलेली एजन्सी आणि ११० कोटी रुपये खरेदी फक्त कागदावरच याप्रकरणी दैनिक महाराष्ट्र आरंभ कोविड कार्यकाळातील भ्रष्टाचाराचा पाढा भाग एक लवकर सुरू करणार आहे. कोविड कार्यकाळातील साहित्य व निधी खर्चाबाबतच्या प्रशासकीय मान्यता दैनिक महाराष्ट्र आरंभच्या हाती आहे. या घोटाळ्यात असलेले अनेकांचे निलंबन का? नाही याची देखील चौकशी होणे गरजेचे आहे. तसेच कोविड साहित्य व निधी खर्चातील औषध वाटप प्रमुख एजाज अली उस्मानी व तानाजी ठाकर यांची झाली. पुन्हा नेकनूर उपजिल्हा रुग्णालयात बदली कोणाच्या आशीर्वादाने झाली.

# बीड तालुक्यात कोण होणार सरपंच, आरक्षण झाले निश्चित

- तालुक्यातील १७५ पैकी ८९ ग्रामपंचायतींमध्ये महिला राज
- अनुसूचित जातीच्या ११ तर अनुसूचित जमातीच्या एका महिलेला संधी
- ओबीसी महिलांपैकी २४ तर खुल्या प्रवर्गातील ५३ महिला होणार सरपंच

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ मधील नियम – ३ – (अ), ब तसेच ४ प्रमाणे तालुका निहाय बीड जिल्हयातील १०३४ ग्रामपंचायती वेगवेळया प्रवर्गासाठी व महिलासाठीच्या सरपंच पदाचे आरक्षण मंगळवारी (२५ मार्च) निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार १०३४ पैकी अनुसूचित जातींच्या माहिलासाठी ७३, अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी आठ, नागरिकांचा मागास प्रवर्ग (एसबीसी) १४२ तर खुल्या प्रवर्गातील ३०३ महिलांना सरपंच पदाचे आरक्षण मिळणार आहे, अशी अधिसूचना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी जारी केली.



हे आरक्षण निश्चित करताना त्या त्या तालुक्यातील अनुसूचित जाती, जमाती, नागरिकांचा मागासप्रवर्ग आणि सर्वसाधारण प्रवर्गाच्या व्यक्तींसाठी त्या त्या जाती, जमाती व मागास प्रवर्गीय महिलांसाठी ग्रामपंचायतींची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार निश्चित केली आहे. तालुक्यातील ग्रामपंचायतींमधील सरपंच पदे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि सर्वसाधारण प्रवर्ग यासाठी राखीव ठेवताना महाराष्ट्र ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ मधील नियम ५ व ६ मध्ये नमुद तरतुदी तसेच ग्रामविकास विभागाने वेळोवेळी निर्गमीत केलेले शासन निर्णय, आदेश आणि परिपत्रकानुसार सरपंच पदाच्या आरक्षणाची कार्यवाही नियमानुसार पूर्ण करावी, असे आदेशही जिल्हाधिकारी यांना जिल्हयातील सर्व तहसीलदारांना दिले होते. याबाबत सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी शैलेंद्र सूर्यवंशी, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, तहसीलदार अविनाश शिंगटे यांनी सविस्तर प्रशिक्षण घेतले होते.

बीड तालुक्यातील एकूण १७५ सरपंच पदांपैकी अनुसूचित जातीतील सर्वसाधारणसाठी १० आणि महिलांसाठी ११, अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी एक, नागरिकांच्या मागास प्रवर्गातील सर्वसाधारणसाठी २३ तर महिलांसाठी २४, खुल्या प्रवर्गातील सर्वसाधारणसाठी ५२ आणि महिलांसाठी ५३ असे सरपंच पदाचे आरक्षण असेल. बीड तहसील कार्यालयात वरील प्रमाणे महिला आरक्षण काढण्याची प्रक्रिया मंगळवारी दुपारी अकरा वाजता सुरू झाली. यावेळी उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार सुहास हजारे, नायब तहसीलदार प्रशांत जाधव, अव्वल कारकून महादेव चौरे, वामन तोगरगे, संतोष मुळीक, महसूल सहाय्यक सुधाकर नागरगोजे, अमोल डोंगरे, ग्राम महसूल अधिकारी कृष्णा रत्नपारखे, दादासाहेब शेळके व कार्यालयीन अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. सर्वप्रथम तालुक्यातील उपस्थित सर्व नागरिकांना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी कशा पद्धतीने आरक्षण सोडत काढण्यात येईल, याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. शिवाय कोणाला काही अडचण असल्यास त्यांनी ती अडचण मांडावी जेणेकरून त्यांचे समाधान होईल, असे सांगितले. यावेळी लहान मुलगा श्रेयस गायकवाड याच्या हस्ते चिठ्ठ्या काढण्यात आल्या. ह्या प्रक्रियेची संपूर्णतः व्हिडिओग्राफी करण्यात आली. उपस्थित नागरिकांनीही सदरची प्रक्रिया अगदी सुटसुटीतपणे आणि कायदेशीरपणे झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले.




# शेतकऱ्याचा मुलगा झाला पोलीस अधिकारी

## राजेश निर्मळ यांनी आई–वडिलांची केले स्वप्न साकार

पाटोदा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यांमध्ये एका छोट्याशा पिट्टी गावामध्ये अतिशय गरीब परिस्थितीमध्ये घरची परिस्थिती बिकट असताना त्याने स्वतःच्या जिद्दीवर विश्वास ठेवत आपलं नाव एका सुवर्ण पानावर कोरले आहे. त्याच्या त्या मेहनतीचे फळ त्यांना आज भेटले आहे कारण आज त्यांची पोलीस उपनिरीक्षक पीएसआय पदी निवड झाली आहे या निवडीमुळे सर्वत्र कौतुक होत असून आनंद व्यक्त होत आहे.

राजेश ईश्वर निर्मळ हा एका शेतकरी कामगाराचा मुलगा अत्यंत ग्रामीण भागात राहून शिक्षणाचे धडे जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये घेतल्यानंतर अनेक संस्थांच्या माध्यमातून त्यांनी आपली वाटचाल अत्यंत प्रतिकूल परिस्थितीनंतरही सुकूर केली. नम्रता हाच जीवन सुधारण्याचा मार्ग असतो ही बांधिलकी त्याने कायम जपली. आई वडील ,मित्र यांचा विश्वास त्यांनी कधीही पडू दिला नाही. बाबळीचे झाड पावलोपावली मिळते, परंतु चंदन शोधावे लागते या युक्ती नुसार त्याने विविध शाळा महाविद्यालयातील शिक्षक बांधवांची वैचारिक कास धरून त्यानुसार दिशा ठेवली. प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा खोमणे वस्ती येथे करून पुढील माध्यमिक शिक्षणासाठी जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय निरगुडी येथे झाले



अध्ययन करताना त्याने प्रत्येक गुरुजनांचा, मित्रांचा, आदर्श व्यक्तीच्या मार्गदर्शनाला अंतिम मानून त्यानुसार कष्ट परिश्रम घेत वाचनाची सवय लावली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार आणि कार्याला अगदी समोर ठेवून त्याने पायाचे पण नसले तरी चालेल पण हातात पुस्तक असले पाहिजे ही भूमिका तंतोतंत पाळली. प्रत्येक जण खरतर जीवन विद्यार्थी जगत असतो. वैचारिक प्रगल्भता, शांत, संयमी, संवेदनशील, या गुणांची त्याने कायम स्वतःच्या जीवन वाटचालीत पेरणी केली. प्रचंड संघर्षशील प्रवास त्याच्या वाट्याला आला. वडिलांनी काही दिवस ऊस तोडला .ऊस तोडत आसताना नंतर शरीर साथ देत नसल्याने शेतीचा पर्याय निवडला. शेतकऱ्याचा मुलगा असलेल्या राजेश ने सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या, ऊसतोड मजुरांच्या, समस्या पाहिल्या आणि जगल्या सुद्धा.

आई–वडिलांच्या वेदना ची जाण ठेवत प्रत्यक्ष डोळ्यांनी जाणून त्यांनी रात्रीचा दिवस आणि ,दिवसाची रात्र करून जिद्द, आत्मविश्वास, परिश्रम, आणि महान जिद्दीच्या बळावर यशाचे शिखर गाठले.आणि त्यांची एमपीएससीमार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत हॅलो पोलीस उपनिरीक्षक (झड्ख) म्हणून निवड झाली आहे.

# पालिकेच्या मालकीचे ओपनस्पेस गिळंकृत करणाऱ्यांचा होणार पर्दाफाश : मुळूक

## उपमुख्यमंत्र्यांच्या आदेशनंतर मुख्याधिकाऱ्यांनी नेमली चौकशी समिती

बीड । प्रतिनिधी

बीड नगर पालिकेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या आशीर्वादाने लहान मुलांना खेळण्यासाठी व ज्येष्ठ नागरिकांसाठी गार्डनकरीता आरक्षित असलेले शहरातील नगरपालिकेच्या मालकीचे भूखंड व महत्वाच्या ठिकाणचे ओपन स्पेस भू माफियांनी ताब्यात घेतले आहेत. या प्रकरणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी शिवसेनेचे मुख्यनेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे तक्रार केल्यानंतर शिंदे यांनी बीडमधील बोगस पीटीआर, पीआर कार्ड प्रकरणी चौकशीचे आदेश दिले होते. या आदेशानंतर नगर पालिकेने बोगस पीटीआर व पीआर कार्ड प्रकरणी चौकशी समिती नेमली असल्याची माहिती जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी दिली. दरम्यान मुख्याधिकाऱ्यांनी नेमलेल्या चौकशी समितीमुळे नगर पालिकेतील बोगस पीटीआर व पीआरचे रॅकेटचा पर्दाफाश होणार असून पालिकेच्या मालकीचे असलेले ओपनस्पेस अतिक्रमणमुक्त होतील असे मुळूक यांनी म्हटले आहे.



शहरातील भू माफियांनी नगर पालिका कर्मचाऱ्यांना हाताशी धरुन शहरातील महत्वाच्या ठिकाणी असलेल्या ओपन स्पेसवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले आहे. एवढेच नाही तर कर्मचाऱ्यांना हाताशी करुन ओपन स्पेसचे बोगस पीटीआर आणि पीआर कार्डही काढले आहेत. या प्रकरणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी शिवसेनेचे मुख्यनेते तथा राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन निवेदन दिले. या प्रकरणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रधान सचिव यांना बीड नगर पालिकेतील बोगस पीटीआर, पीआर व अनाधिकृत अतिक्रमण करुन गिळंकृत केलेल्या ओपन स्पेस संदर्भात चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. उपमुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर मुख्याधिकाऱ्यांनी चौकशी समिती नेमली आहे. पालिकेचे नगररचनाकार द.शं.तरोडे हे समितीचे अध्यक्ष असून समितीमध्ये आठ जणांचा समावेश आहे. मुख्याधिकाऱ्यांनी समिती गठित केल्याचे आदेशही काढले असून नगर पालिकेच्या जागांची बीड नगर पालिकेच्या नावे पीटीआर वर नोंद असल्याची अभिन्यासनिहाय तसेच प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन खात्री करावी, शहरातील नगर पालिका हद्दीमधील सर्व अभिन्यासातील खुल्या जागांची तसेच नगरपालिकेच्या मालकीच्या जागांची पीटीआर तयार करुन त्यांचे एकत्रित नगर पालिका मालमत्ता रजिस्टर तयार करावे असे आदेशात म्हटले आहे. या प्रकरणी अनुपालन अहवाल १५ दिवसांत सादर करावा, यात विलंब झाल्यास समिती अध्यक्ष जबाबदार राहतील असेही मुख्याधिकाऱ्यांनी आदेशात म्हटले आहे. दरम्यान चौकशी समितीचा अहवाल आल्यानंतर भू माफियांसह नगर पालिकेतील अधिकारी, व कर्मचारी यांचेही पितळ उघडले पडणार असून मुख्याधिकाऱ्यांनी नेमलेली समिती नि:पक्ष काम करेल असा विश्वास जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी व्यक्त केला आहे.




# धारुरचे मुख्याधिकारी महेश गायकवाड यांचा सत्कार

धारुर । प्रतिनिधी

धारूर येथील नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश गायकवाड यांची उपायुक्त म्हणून पदोन्नती झाल्याबद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

महाराष्ट्रात शहरी प्रशासकीय सेवेतील मुख्याधिकारी गट ब संवर्गातून गट अ संवर्गात अनेक अधिकाऱ्यांना निव्वळ तदर्थ स्वरुपात पदोन्नती देवून पदस्थापना राज्य शासनाकडून देण्यात आले आहे यात धारुर नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश गायकवाड यांचा समावेश आहे. त्यांची सहाय्यक उपायुक्त नगर विकास विभाग म्हणून पदोन्नती झाली असून त्यांच्या पदोन्नतीबद्दल धारूर नगर परिषदेचे गटनेते सुधीर (तात्या) शिनगारे यांनी सत्कार करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# बाळासाहेब दोडतले यांच्याकडून डिजिटल मीडिया परिषदेच्या नूतन कार्यकारिणीचा सत्कार



अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यमंत्री व यशवंत सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष बालासाहेब दोलतडे यांच्या वतीने मराठी पत्रकार परिषद संलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषद अंबाजोगाईच्या नूतन कार्यकारणी चा अध्यक्ष संग्राम महाराष्ट्राचा न्यूज चैनल संपादक श्री अभिजीत लोमटे, कार्याध्यक्ष अंबाजोगाई दर्शन न्यूज चॅनल चे संपादक सतीश मोरे कोषाध्यक्ष व एन टीव्ही न्यूज चॅनलचे प्रतिनिधी मनोज कोकणे सह कोषाध्यक्ष व जंग न्यूज चॅनल अहमद पठाण यासह नूतन कार्यकारिणीचा फेटा शाल पुष्पगुच्छ सत्कार करण्यात आला यावेळी सामाजिक कार्यकर्ते संजय साळवे युवा उद्योजक लहू सुरवसे युवा उद्योजक अंकुश सुरवसे यांच्यासह अनेक जण उपस्थित होते अलीकडच्या काळात डिजिटल मीडियाला अधिक महत्त्व प्राप्त झाले असून डिजिटल मीडियाच्या माध्यमातून आपल्या शहराचा ग्रामीण भागाचा विकासात्मक बातम्या प्रकाशित करून सर्वसामान्य जनतेला न्याय देण्याचे काम डिजिटल मीडियाच्या माध्यमातून करावे नुकत्याच झालेल्या डिजिटल मीडियाच्या नूतन कार्यकारणीत आमच्या मित्राचा सहभाग झाल्याने यशवंत सेनेच्या वतीने हा सन्मान आम्ही केला आहे असे मत माजी राज्यमंत्री व यशवंत सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री बाळासाहेब दोडतले यांनी बोलताना व्यक्त केले.

# गुरुकुल प्री प्रायमरी नॅशनल इंग्लिश स्कूल, क्लासेस गुरुकुल वार्षिक स्नेहसंमेलन

बीड । प्रतिनिधी

दिनांक २३ मार्च २०२५ रोजी शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पड़ले. या कार्यक्रमाची प्रस्तावना नयनकुमार सर यांनी केली व कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती प्रतिमा पूजन करून करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष भागवत बप्पा देशमुख (तज्ञ संचालक, तेलगाव सहकारी साखर कारखाना) तसेच कार्यक्रमाचे उद्घाटक बाबासाहेब बरिदे (रेणुका पब्लिक स्कूल, प्राचार्य), सुदाम अप्पा देशमुख (सेवा सोसायटी चेअरमन) व नितीन ढाकणे (संपादक, दैनिक अतुल्य महाराष्ट्र), शाळेचे अध्यक्ष महेश देशमुख, उपाध्यक्ष सचिन घाडगे सर, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती घाडगे



मॅडम, उपमुख्याध्यापिका श्रीमती. माने मॅडम उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून असिस्टंट पोलिस इन्स्पेक्टर श्री. दहिफळे, केंद्र प्रमुख श्री. मुंडे सर, पत्रकार संघाचे अध्यक्ष श्री. मिलिंद चोपडे साहेब,पत्रकार श्री. अतुल बडे, पत्रकार श्री. अशोक गलांडे साहेब, कृषी युनियन सिरसाळा चे अध्यक्ष श्री.शरद (काका) कदम, ग्रामपंचायत चे सदस्य श्री. देवराव काळे, ॲड. सतीश काळे, सेवा सोसायटी चे चेअरमन संतोष पांडे साहेब, श्री. सुमंत अण्णा देशमुख, श्री. मधुकर हरिभाऊ टोंपे, श्री. रूपनर साहेब,सरपंच श्री. सतीश सलगर इत्यादी उपस्थित होते .

या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न झाला याची प्रस्तावना व आयोजन शाळेचे सदस्य श्री नवगरे सर यांनी केले. विवेक पवार, रिझवान इनामदार, संतोष जाधव, श्रियोग जाधव, समर्थ कराड, मानसी चोपडे, श्रुती महाजन, पल्लवी ललवाणी, शुभांगी बाबर, शुभम फुलारी, यश राठोड, अमित भिसे, प्रगती काळे, वैष्णवी जाधव. वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध नृत्य सादरीकरण केले जसे की गणेश वंदना, गोंधळ, नव्वद च्या दशकातील लोकप्रिय गाणी, शंभू राजे, मराठी गाणी, कव्वाली, नाटके, गरबा तसेच देशभक्ती गाण्यांनी प्रेक्षकांची मन मोहित केली.या कार्यक्रमात प्रीतम राठोड, शोएब शेख, सोफियान पठाण, राधिका कुशवाहा, यशश्री सांगळे, जान्हवी देशमुख, आरोही उपादे, मुन्नाजा पठाण, माहिरा पठाण या विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालन खूप प्रभावीरीत्या केले. हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी अपार मेहनत घेतली व या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन नयन कुमार सर यांनी केले. तसेच कार्यक्रमाची समाप्ती शांती पाठाद्वारे झाली.

# अजितदादा नुसतं पालकत्व स्विकारुन बीड जिल्ह्यातील मायबाप जनतेचे पोट भरणार आहे का?

## बीड जिल्ह्यात बारामती पॅटर्न राबवा



आडे-मुद्दा क्रॉस

बीडमध्ये गुन्हेगारी वाढली आहे. त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. वाढत्या गुन्हेगारीसोबतच जातीय तणाव देखील निर्माण होत आहे. यामुळे सामाजिक सलोखा बिघडला आहे. जिल्ह्यातील वाढलेल्या गुन्हेगारीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गुन्हेगारांना पोलीसांचा धाक राहिला नसल्याचे दर्शविणारी आणखी एक घटना समोर येत आहेत सातत्याने वाढ होताना मिळत आहेत. वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे सर्वसामान्य लोकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेची विस्कटलेली घडी, मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे निर्माण झालेला आक्रोश अशा विविध कारणांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जिल्ह्याचे पालकमंत्रीपद स्वत:कडे घेतले. पद घेतल्यानंतर उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार पहिल्यांदा दि. ३० जानेवारीला जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीसाठी शहरात आले होते. आणि आता २ एप्रिलला अजून येत आहेत. परंतु जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे. दिवसेंदिवस अनेक गुन्हेगारींच्या घटना उघडकीस येत आहेत. जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून अजितदादा यांच्याकडे बीड जिल्ह्यातील जनतेच्या अपेक्षा वाढल्या आहेत. आणि हे वाढती गुन्हेगारी रोखण्याचे आव्हान उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून अजितदादांसमोर असणार आहे.

गेल्या कांही महिन्यांपासून जिल्हयातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे, त्याला कारणही तसेच आहे. गुन्हेगारी स्वरूपाच्या घटना जिल्ह्यात मोठया प्रमाणात वाढल्या आहेत. चोऱ्या, खून, मारामाऱ्या, महिलांवर अत्याचार, खंडणी वसुली, तलवारी, रिव्हॉल्व्हर अशा घातक शस्त्रास्त्रांचा वापर सर्रास होताना दिसून येत आहे. बीड, परळी, अंबेजोगाई, माजलगांव, गेवराई सह सर्वच तालुक्यात गुन्हेगारांनी हैदोस मांडला आहे. पोलिसांचा कसलाही धाक अथवा नियंत्रण राहिले नाही. जिल्ह्यात पोलीस यंत्रणा आहे की नाही असा प्रश्न सर्व सामान्यांना पडला आहे. बीड जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी थांबवा, तसेच बीड जिल्हा हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून, ओळखला जातो परंतु या जिल्ह्याचा विकास आणि बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून अजित दादा तुम्हीच मैदानात उतरून बीड जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी मुक्त करा. आणि जिल्हा प्रगतीशील करा!

## ब्रह्मा-विष्णू-शिवांचे दर्शन घडवणारा योग!



गेवराई - सावता नगर येथील महाशिवपुराण सुरू असल्याने कथा श्रवणाच्या वेळेत महादेवाच्या वेशभूषेत गायत्री पांडे, विष्णूच्या स्वरूपात प्रणाली पांडे तर ब्रह्मदेव यांच्या रूपात श्रावणी जमदाडे, श्री नारायणाच्या रूपात ओम टोणपे यांनी वेशभूषा घेऊन अनेक भाविक भक्तांचे मन् जिंकली!

## श्री.संत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठान परिसरातील गरोदर मातांची नोंदणी करण्यास अंगणवाडी सेविकांचा नकार !

### बीड शहरातील अंगणवाडी व प्रकल्प अधिकाऱ्याची चौकशी करून निलंबन करावे : वीर

बीड । प्रतिनिधी

महिला व बालके विकास अंतर्गत शहरातील अंगणवाड्यात सावळा गोंधळ दिसून येत आहे. संत भगवान बाबा प्रतिष्ठान परिसरातील गरोदर माता यांच्या नोंदणीला येथील अंगणवाडी सेविकांचा नकार असून अंगणवाडी भगवानबाबा प्रतिष्ठान परिसरात असतानाही कार्यक्षेत्र नसल्याचे सांगत नोंदणीस नकार देणाऱ्या अंगणवाडी सेविका व महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी ढाकणे यांची चौकशी करत निलंबित करण्याची मागणी संत भगवान बाबा प्रतिष्ठान परिसरातील नागरिकांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली आहे.

बीड शहरातील अनेक भागात अंगणवाडी बाबत नागरिकांच्या तक्रारी असून जसे की तीन ते सहा वर्ष वयोगटातील बालकांना येणारा शिधा हा अत्यंत निकृष्ट दर्जाचा असून, त्यात आळ्या देखील असल्याचे तक्रारी आहेत. तसेच गरोदर मातांना दिल्या जाणाऱ्या किट त्यामध्ये गादी, ताप तपासण्यासाठी थर्मामीटर, मच्छरदाणी, खेळणी, हगीज असे देणे बंधनकारक असताना देखील अंगणवाडी सेविकांच्या मनमानी कारभारामुळे गरोदर माता या किट पासून वंचित राहतात.

बीड शहरातील खासबाग भागामधील दोन अंगणवाड्या असून श्री.संत भगवान बाबा प्रतिष्ठान येथील गरोदर माताची नोंद करण्यास असणाऱ्या गरोदर मातांची नोंदणी करण्यासाठी अंगणवाडी सेविका कडून नकार दिला जात आहे. याचे कारण परिसरातील नागरिकांनी विचारले असता हा परिसर आमच्या कार्यक्षेत्रात नसल्याचे अंगणवाडी सेविका कडून सांगितले जात आहे महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी ढाकणे यांच्याशी चर्चा केली असता त्यांनीही उडवा उडवीची उत्तरे दिली संत भगवान बाबा परिसर हा इतर राज्यात येतो का असावाही परिसरातील नागरिकांनी केला मात्र या ठिकाणी असलेल्या अंगणवाडी सेविकावर याचा कोणताही परिणाम झाला नाही. महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी ढाकणे व अंगणवाडी सेविका यांची तक्रार मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे करण्यात आली असून बीड शहरातील सर्वच अंगणवाड्याची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी आनंद वीर यांनी केली आहे.

## आंबेडकर जयंतीनिमित्त पोलीस स्टेशन सिरसाळा येथे शांतता समितीची बैठक संपन्न

सिरसाळा । प्रतिनिधी

दिनांक २४ रोजी सोमवार आगामी सण व सुव्यवस्था राखण्यासाठी सिरसाळा पोलीस स्टेशन ने येथे शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला गावातील प्रतिनिधी नागरिक विविध क्षेत्रातील कार्यकर्ते सहभागी झाले होते. या बैठकीत आगामी सण उत्सव सौंदर्यपूर्ण वातावरणात साजरे करण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक उपयोजना वरील विचार द्विमठ करण्यात आला.



पोलिसांनी नागरिकांना कोणत्याही अफवा वर विश्वास न ठेवण्याचे आव्हान केले. आणि सामाजिक सौहार्द बिघडवणाऱ्या कोणत्याही कृत्यापासून दूर राहण्याचे आवाहन केले. तसेच कोणत्याही अडचणीच्या वेळी आपण आपली जबाबदारी म्हणून पोलीस स्टेशन येथे कळवावे ही विनंती सिरसाळा पोलीस स्टेशनचे पीएसआय आनंदजी जाधव साहेब यांनी मार्गदर्शन या शांतता बैठकीमध्ये केले आहे रमजान ईद सध्या चालू आहे व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती यासाठी पण शांतता कमिटीची बैठक बोलावली होती त्या बैठकीत मार्गदर्शन करताना पीएसआय जाधव साहेब यांनी पत्रकार बांधव व गावातील सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य सेवा सहकारी सदस्य व पुढारी मंडळी व सामान्य नागरिक या बैठकीला उपस्थित होते.

## तबब्ल २५ वर्षांनी माजी विद्यार्थी आले एकत्र

बीड । प्रतिनिधी

शहरातील जुनी शाळा कनकालेश्वर विद्यालय आकाशवाणी रोडच्या सन १९९९-२००० च्या १० वीच्या बॅचचे स्नेह संमेलन दि.२३ मार्चला उत्साहात संपन्न झाले. तब्बल २५ वर्षांनी विद्यार्थी एकत्र आल्याने शाळेतल्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. एकमेकांची प्रगती व सुखदु:खाचे प्रसंग कळाले. यावेळी गुरुवर्य शिक्षक श्री सुदामराव शिंदे, वाकचौरे सर, काझी सर, समेळ सर यांनी विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन व सध्या ते काय करतात याचा परिचय घेतला शेवटी या कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री शेकडे सर यांनी समारोपीय भाषण केले.



यावेळी श्री गोलेकर सर, बांगर सर, शिंदे मॅडम, गावडेताई हे शिक्षक उपस्थित होते. याप्रसंगी सर्व विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले सुत्रसंचलन पेनुरकर, रवी वाघमारे, शेख युनूस यांनी केले. महिला माजी विद्यार्थी विनंती कांबळे, संगिता सुळ, शालू गायकवाड, लोखंडे,उषा शेळगावकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. हा स्नेह संमेलनाचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महेंद्र वडमारे, विशाल सोनवणे, शेख नय्युम, नितीन जोगदंड, रवी वाघमारे यांनी मेहनत घेतली. माजी विद्यार्थी पत्रकार पवन सपकाळ यांनी गुरू माझे गणगोत व मित्र वनव्या मध्ये गारव्या सारखा हे गीत सादर करीत कार्यक्रमाची शोभा वाढवली शेवटी स्नेह भोजनाने कार्यक्रमाचा समारोप झाला.



## अदिराज चव्हाणची जवाहर नवोदय विद्यालयासाठी निवड

धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील शैक्षणिक गुणवत्तेत आघाडीवर असणाऱ्या ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयात बालवयापासून विविध शालेय स्पर्धा परीक्षांचे आयोजन करण्यात येते. या शालेय स्पर्धांमध्ये विद्यार्थी घवघवीत असे यश संपादन करत असतात तसेच दरवर्षी प्रमाणे याही वर्षी जवाहर नवोदय विद्यालय गढी जिल्हा बीड यांच्या वतीने सन २०२३ - २४ मध्ये जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी परीक्षा घेण्यात आली होती.

त्यामध्ये ज्ञानदीप विद्यालयातील विद्यार्थी चि. अदिराज बालाजी चव्हाण याची तिसऱ्या यादीमध्ये जवाहर नवोदय नवोदय विद्यालय गढी, जिल्हा बीड या ठिकाणी ६ वी वर्गाच्या प्रवेशासाठी निवड झालेली आहे. या निवडीबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री शेख. एस.एस. वर्गशिक्षक श्री अंडिल ए.आर. विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद, पालक वर्ग व संस्थेचे सर्व पदाधिकारी यांच्याकडून कौतुक व अभिनंदन होत आहे.

## पवित्र रमजाननिमित्त शिवसेना उबाठा पक्षाच्या वतीने इफ्तार पार्टी

शिरूर कासार । प्रतिनिधी

अखंड हिंदुस्थानाच्या आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सैन्यात १३ विश्वासू मुस्लिम सेनापती होते सिद्धी हिलाल, दौलत खान, इब्राहिम खान, काझी हैदर, सिद्धी इब्राहिम, सिद्धी वहा, नूरखान शमा खान, हुसेन खान, मियानी सिद्धी, मिस्त्री सुलतान खान, दाऊद खान, आणि मधीरा मेहतर या सर्व मावळ्यांचा इतिहास डोळ्यांसमोर ठेवून आज शिरूर शहरातील मरकज मस्जिद मध्ये शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे व शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर यांच्या माध्यमातून पवित्र रमजान ईद निमित्त इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते सध्यस्थितीत देशात व राज्यात वरिष्ठ स्तरावर राजकीय पटलावर एन केन प्रकारे हिंदू-मुस्लीम वाद पेटवून आपली राजकीय पोळी शेकण्याचे काम मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यामुळे सर्वत्र सामाजिक वातावरण दुषित होवून एकमेकांविषयी कमालीचा द्वेष पसरत असून याचे लोण आता ग्रामीण भागातही पसरताना दिसत आहे. दोन समाजात दरी निर्माण करण्याचे काम होत असताना ग्रामीण स्तरावर हिंदू-मुस्लिम या दोन्ही समाजातील सामान्य नागरिक सलोख्याचे वातावरण निर्माण होवून आपसातील समंध सलोख्याचे राहण्यासाठी विविध उपक्रमाद्वारे प्रयत्न करताना दिसत आहेत.



सध्या मुस्लिम समाजाचा पवित्र असा रमजान महिना सुरु आहे या महिन्याचे औचित्य साधून शिरूर कासार परिसरातील शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे यांच्यासह हिंदू मंडळींनी एकत्र येत आज शिरूर मध्ये मुस्लीम बांधवांसाठी रोजा इफ्तारीचा कार्यक्रमाचे आयोजन केले होते. येथील बाजारातील मरकज मस्जिद समोरील पटांगणात हा इफ्तारचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. या कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिला व मोठ्या प्रमाणात दोन्ही समाजातील नागरिक उपस्थित होते. त्याचप्रमाणे परिसरातील राजकीय सामाजिक पत्रकार गोकुळ भाऊ व शिरूर शहरातील मुस्लिम बांधव व बाकीचे मित्र मंडळी जातीने हजर होती. त्यामुळे मोठ्या उत्साहाने इफ्तार पार्टीचा कार्यक्रम पार पडला. यावेळी या पवित्र रमजान ईद सणाच्या उपवासा निमित्त इफ्तार पार्टीचे आयोजक शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे व शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर व पुण्यनगरीचे पत्रकार गोकुळ भाऊ पवार परिसरातील पत्रकारांसह मोठ्या संख्येने हिंदू व मुस्लिम समाज बांधव उपस्थित होते.

तसेच रमजानच्या रोजाची सांगता एकतारने होते सूर्य उदयपूर्वी तांबड फुटण्यापूर्वीपासून तर सूर्यास्तानंतरची लालसर कांती फिटेपर्यंत दिवसभर रोजा ठेवून सूर्यस्थानानंतर थोडसं काही खाऊन पाणी प्याले जाते आणि त्यानंतर खाण्यापिण्यास परवानगी असते या सोपस्कारला इफ्तार म्हणतात. प्रेरणादायी शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे व शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर यांनी इफ्तार पार्टीचे आयोजन करून केली अनोखी सुरुवात राजकीय सामाजिक क्षेत्रातील मंडळींनी मुस्लिम बांधवांना दिल्या शुभेच्छा यावेळी इफतार पार्टीच्या नियोजनासाठी फयाज भाई यांचा मोलाचा वाटा अशा कार्यक्रमांनी सद्भावना निर्माण होईल दिवाळीत मी अली आहे तर रमजान मध्ये मी राम आहे, यही मेरे भारत असली पहेचान है. देशात व राज्यात अनावश्यक मुद्यांना महत्व दिल्याने समाजात द्वेषभावना पसरवण्याचे काम होत आहे. परंतु अशा कार्यक्रमांनी सामाजिक सद्भाव निर्माण होणार शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर प्रेमाचे वातावरण निर्माण करता येईल मंदिर कि घंटी भारत कि पहचान है, और अजान देश कि शान है, जो यह समझे, वही इन्सान है, राज्यात सामाजिक शांततेला धोका पोहोचवून सामाजिक वातावरण बिघडविणार्यांना यापुढे असेच सामाजिक सलोख्याचे कार्यक्रम घेवून द्वेषाने नव्हे तर प्रेमाचे वातावरण निर्माण करता येईल.

# चकलांबा पोलीस ठाण्यातील दोन पोलीस कर्मचारी निलंबित!

## ■ पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांचा दणका; कुख्यात खोक्या भोसलेला मदत करणं भोवलं ■ सपोनि संदीप पाटील यांना देखील बजावली कारणे दाखवा नोटीस; त्यांच्यावरही कारवाई होण्याची शक्यता?

गेवराई | प्रतिनिधी

आमदार सुरेश धसांचा कार्यकर्ता खोक्या भोसले याला कारागृह परिसरात व्हीआयपी ट्रिटमेंट दिल्याचे समोर आले होते. खायला बिर्याणी आणि हात धुवायला बंद बाटलीतील पाणी, सोबत डझनभर नातेवाइक असा लवाजमा असलेला एक कथित व्हिडीओ सोमवारी सायंकाळी व्हायरल झाला होता. याचे वृत्त प्रकाशित करताच जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी चकलांबा पोलिस ठाण्यातील दोन कर्मचाऱ्यांना निलंबीत केले आहे. तसेच ठाणेदारालाही कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. कैलास खटाणे आणि विनोद सुरवसे अशी निलंबीत कैलेल्या पोलिसांची नावे आहेत. शिरुर कासार तालुक्यातील झापेवाडी येथील सतीश ऊर्फ खोक्या भोसले याने बुलडाणा जिल्ह्यातील एका व्यक्तीला अर्धनग्न करून बॅटने मारहाण केली होती. तसेच बावी येथील ढाकणे बापलेकाला मारहाण करून दात पाडले होते.





याप्रकरणी खोक्याविरोधात तीन गुन्हे दाखल आहेत. सोबतच वनविभागाच्या धाडीतही त्याच्या घरात वाळलेले मांस सापडल्याने वेगळा गुन्हा दाखल आहे. याच गुन्ह्यांमध्ये तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे.

दरम्यान, कारागृहात जाण्यापूर्वी खोक्या हा कारागृह परिसरात खाली बसून जेवत होता. त्याच्या बाजूला १० ते १५ नातेवाइक, कार्यकर्ते उभे दिसत होते. सोबतच खोक्याला बोलण्यासाठी मोबाईलही दिला होता. हे सर्व असतानाही पोलिसांनी केवळ बघ्याची भूमिका घेतली होते. व त्यामुळे पुन्हा एकदा बीड पोलिस वादात सापडले होते. याचीच गंभीर दखल घेत पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दोन कर्मचाऱ्यांना निलंबीत केले आहे.

### नोटीस बजावली



अशाप्रकारचे गंभीर प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. चकलांबा पोलिस ठाण्यातील दोन कर्मचाऱ्यांना निलंबीत केले आहे. तर प्रभारी अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. त्यांच्यावरही कारवाई केली जाईल.

– नवनीत कॉवत, पोलिस अधीक्षक बीड

# धारूर तालुक्यातील ५६ ग्रामपंचायत सरपंचाचे आरक्षण सोडत

धारूर | प्रतिनिधी



राज्यातील ग्रामविकास विभाग यांच्याकडून तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षण सोडत २५ मार्च मंगळवार रोजी धारूर येथील तहसील कार्यालयाच्या तळमजल्यामध्ये तहसीलदार श्रीकांत निळे यांच्या उपस्थितीमध्ये संपन्न झाले. यावेळी ग्रामीण भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धारूर तालुक्यातील सरपंचाची पदे वेगवेगळ्या प्रवर्गासाठी व महिलांसाठी पाच वर्षाकरिता २०२५ ते २०३० च्या दरम्यान गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतीकरिता आरक्षित करून संख्या निश्चित करण्यात आलेली आहे. यामध्ये अनुसूचित जाती– ९ ग्रामपंचायती, अनुसूचित जमाती– ०२, नागरिकांचा मागास प्रवर्ग–१५, खुला प्रवर्ग– ३० असे एकुण ५६ ग्रामपंचायतच्या सरपंच पदाचे आरक्षण सोडत पार पडली. यात अनुसूचित जाती साठी पिंपरवाडा, मोहखेड, चिखली, शिंगणवाडी यात महिला सरपंच थेटेगव्हाण, काटेवाडी, उमरेवाडी, कोळपिंपरी, हिंगणी ग्रामपंचायतचा समावेश आहे. अनुसूचित जमातीसाठी आंबेवडगाव, महिला मध्ये धुनकवड, नागरिकांचा मागास प्रवर्ग सर्वसाधारण बोडका, चिंचपूर, सुरनरवाडी, चोंडी, गोपाळपूर, कोयाळ, देवठाणा, नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला व्हरकटवाडी, मैंदवाडी, भोगलवाडी, तांदळवाडी, संगम, अमला –निमला, फकीर जवळा, सुकळी ग्रामपंचायतीचा समावेश आहे. सर्वसाधारणसाठी पहाडी दहिफळ, चारदरी, कोथिंबीर वाडी, असरडोह, अंजनडोह, चोरंबा, गांजपूर, हिंगणी, जहागीरमोहा ,कारी, मोरफळी, मुंगी, पांगरी, रुई धारूर, सोनीमोहा, सर्वसाधारण महिला तेलगाव, भोपा, आरणवाडी, आसोला, गावंदरा, घागरवाडा, कन्नापूर, कासारी, खोडस, कुंडी, आवरगाव, वाघोली, पहाडी पारगाव, देवदहिफळ, चाटगाव अशी ५६ ग्रामपंचायत सरपंच पदाची आरक्षण सोडत संपन्न झाली.

तालुक्यातील ग्रामस्थांसमोर लहान मुलाच्या हाताने चिठ्ठी काढून सरपंच आरक्षण प्रक्रिया पार पाडली. यावेळी धारूर तहसीलचे तहसीलदार श्रीकांत निळे नायब तहसीलदार सुरेश पाळवदे, नायब तहसीलदार निवडणूक अधिकारी ढाकणे सह तालुक्यातील मतदार नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आरक्षण सोडत पार पडताच भावी सरपंच कामाला लागत नमस्कार चमत्कार करून मीच दावेदार असल्याचे ग्रामस्थांना सांगताना तहसील परिसरामध्ये पाहायला मिळाले.

# कुणाल कामराच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन

## नेकनुर पोलिसांकडे युवा सेनेच्या वतीने निवेदन सादर

नेकनूर | प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर अतिशय खालच्या पातळीवर जाऊन गाणे बनवणाऱ्या कुणाल कामरा वर गुन्हा दाखल करावा या मागणीसाठी युवा सेनेच्या वतीने मंगळवारी ता.२५ कुणाल कामरा यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले. यावेळी युवासेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर अतिशय खालच्या पातळीवर जाऊन गाणे तयार करून गाणे गायले. या गाण्यामुळे राज्यभरात मोठा वाद सुरु झाला आहे. ठिकठिकाणी कामरा यांच्यावर टिकेची झोड उठू लागली आहे.

दरम्यान, नेकनूर येथे आज युवासेना बीड जिल्हाप्रमुख सुजीत शिंदे, युवासेना जिल्हाप्रमुख रवीराज बडे यांच्या नेतृत्वाखाली कुणाल कामरा यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन केले. त्यानंतर पदाधिकाऱ्यांनी नेकनुर पोलिसांकडे निवेदन सादर केले आहे. कामराच्या या कृत्यामुळे युवा सैनिकांच्या भावना दुखावल्या असून यापुर्वीही त्यांनी विनोदाच्या नावाखाली खालच्या पातळीवर जाऊन टिका केली आहे. त्यातून राज्यात अशांतता पसरीविण्याचे काम सुरु असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात कुणाल कामरा यांच्यावर गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी युवासेना बीड जिल्हाप्रमुख सुजीत शिंदे, युवासेना बीड जिल्हाप्रमुख रवीराज बडे यांच्यासह युवासेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शाहू फुले आंबेडकर निवासी आश्रम शाळेच्या शिक्षकांचे उपोषण

## स्व.धनंजय नागरगोजे यांच्यासारख्या शिक्षकांची आत्महत्या थांबवा

बीड | प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यातील शाहू फुले आंबेडकर अनु सुचित आश्रम शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे जिल्हाधिकारी कार्यालय समोर आमरण उपोषण सुरू आहे. राज्यात २००२ पासून शाहू, फुले, आंबेडकर अनुसूचित जाती आश्रम शाळा चालू आहेत. २००६ ला महाराष्ट्र शासनाने या शाळांना मान्यता देण्यात आल्या. व २६ जुलै २०१० ला कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता व संच मान्यता देण्याच्या शासन निर्णय पारित करण्यात आला.२०१२ ला जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत तपासणी करण्यात आली तसेच १६ मार्च २०१५ ला या शाळांची तपासणी करून अ, ब, क, ड वर्गवारी करण्यात आली. व याला शासनाने शाहू फुले आंबेडकर निवासी योजना असे नाव देऊन पात्र १६५ आश्रम शाळांना ८ मार्च २०१९ ला २० टक्के अनुदान देण्याचा शासन निर्णय पारित करण्यात आला त्यानंतर जानेवारी २०२० व डिसेंबर २०२० तसेच ऑगस्ट २०२३ मध्ये ५०० गुणांची तपासणी करण्यात आली. तरी शासनाने अनुदान वितरित केलेले नाही. म्हणून कर्मचारी वर्गावर आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे.



तरी शासनाने याची दखल घेऊन आमच्या खालील मागण्या मान्य कराव्यात. १) स्व. धनंजय अभिमान नागरगोजे यांच्या कुटुंबास ५० लक्ष रु. तात्काळ मदत करण्यात यावी. २) त्यांच्या पत्नी राजकन्या धनंजय नागरगोजे यांना शासकीय सेवेत घेण्यात यावे. ३) राज्यातील शाहू फुले आंबेडकर निवासी १६५ अनुसूचित जातीच्या आश्रम शाळांना व्हीजेएनटी नुसार वेतन श्रेणी प्रमाणे १०० टक्के अनुदान तात्काळ देण्यात यावे. यावेळी बीड जिल्ह्यातील शाहू, फुले, आंबेडकर अनुसूचित जाती आश्रम शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी व शिक्षक मोठ्या बहुसंख्येने आमरण उपोषणास बसले आहेत. यांच्या मागण्या लवकरात लवकर मान्य करा अन्यथा कठोर उपोषण करणार आहे.




# दीड महिन्यांपासून न दिलेली माहिती आठ दिवसात गटशिक्षणाधिकारी देणार का?

धारूर | प्रतिनिधी

येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालय हे सतत चर्चेत असते त्यात आवरगाव येथील संदीप अनंतराव पांचाळ यांनी गेल्या दीड महिन्या पूर्वी समग्र शिक्षा अभियान, व अन्य २०११ पासून ते आज पर्यंत माहिती मिळवण्यासाठी गटविकास अधिकारी पंचायत समिती धारूर यांना माहिती च्या मागणीसाठी रीतसर अर्ज देण्यात आला होते परंतु त्यांनी आजपर्यंत ही माहिती देण्यात आलेली नाही

**शिक्षण विभागातील भ्रष्टाचार उघड येऊ नये म्हणून माहिती देण्यास टाळाटाळ**

त्यामुळे गट विकास अधिकारी पंचायत समिती धारूर यांच्याकडे संदीप पांचाळ यांनी प्रथम आपील केल्याने त्यांनी दि.२० मार्च रोजी प्रथम सुनावणी पंचायत समिती धारूर येथे ठेवण्यात आली होती परंतु या सुनावणीसाठी माहितीचे प्रतिनिधी म्हणून आय इ साधन व्यक्ती श्री मदने डी एन हे उपस्थित होते व अपिलार्थी या सुनावणीच्या वेळी उपस्थित होते,यात कोणतीही माहिती दिलेली नाही त्या नंतर गटविकास अधिकारी पंचायत समिती धारूर यांनी गटशिक्षणाधिकारी धारूर यांना आठ दिवसात माहिती देण्यात यावी असे सुनावले आहे व माहिती न दिल्यास पुढील अपील करतील असे पत्र गटशिक्षण अधिकारी यांना गटविकास अधिकारी यांनी दिले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नगरनाका दरम्यान यु टर्न नाही

## न्यायालय, जिल्हाधिकारी, तहसिलला जाण्यासाठी पाऊण किलोमीटरचा हेलपाटा; जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष्य घालावे : डॉ. ढवळे

बीड | प्रतिनिधी

बीड ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील बीड शहरातील २ किलोमीटर रस्त्याचे नियोजन शुन्य काम केल्याने दीड वर्ष लोटूनही शहरातील दोन किलोमीटर अंतराचा रस्ता अद्याप पूर्ण झालेला नाही. याठिकाणी खडी, धुरळा उडुन वाहनचालकांना त्रास होतो. नागरिकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. मनमानी कारभारामुळे व रखडलेल्या कामामुळे अपघाताला निमंत्रण मिळत असून सर्वसामान्यांचे हाल होत आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी या संदर्भाने कठोर भूमिका घेत या कामाची




पाहणी केल्यानंतर महामार्ग प्राधिकरणाचे अधिकाऱ्यांना पत्र देऊन कंत्राट दाराची मनमानी थांबविण्याचे सुचवत सदर काम कोणत्याही परिस्थितीत एक आठवड्याच्या पूर्ण करण्याचे तसेच कंत्राटदारास एक कोटीचा अतिरिक्त दंड करण्याचे निर्देश दिले आहेत. या रस्त्यावरील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नगर नाका दरम्यान यापूर्वी सहा जागेवर यू टर्न घेण्यासाठी जागा सोडण्यात आली होती. सध्या मात्र एकही यु टर्न नाही. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून न्यायालय, तहसील, सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालय येथे जाण्यासाठी नागरिकांना आता नगर नाक्याचा पाऊण किलोमीटरचा हेलपाटा मारावा लागणार आहे. दुसरीकडे या रस्त्याच्या उत्तर बाजूला मुलींचे वस्तीगृह ,जुनी जिल्हा परिषद (ज्यामध्ये आजही अनेक कार्य सुरू आहेत) न्यायालय, तहसिल, मुख्य प्रशासकीय इमारत, सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालय तर दक्षिण बाजूला शासकीय प्रशिक्षण आरोग्य केंद्र, जिल्हा कारागृह, शासकीय विश्रामगृह, चंपावती क्रिडामंडळ, पंचायत समिती आदी कार्यालये आहेत. त्यामुळे भविष्यात या कार्यालयांमध्ये येणाऱ्या नागरिकांच्या अडचणी व संभाव्य अपघात लक्षात घेता पूर्वीप्रमाणेच यु टर्न दुभाजकांमध्ये ठेवण्यात यावेत. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर व शेख युनुस चऱ्हाटकर यांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी बीड यांना केली आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT